एप्रिल २००७

# लेखापरिक्षणासाठी सावधान !

३१ मार्च २००७ रोजी महाराष्ट्र राज्यातील पतसंस्थांसह सर्व नोंदणीकृत सहकारी संस्थांचे सन २००६-२००७ हे आर्थिक वर्षे संपलेले आहे. १४ ऑगस्ट २००७ पुर्वी सर्व सहकारी संस्थांना वार्षिक सर्वसाधारण सभांचे आयोजन करुन व त्यापूर्वी लेखापरिक्षण करुन घेवून सभासदांपुढे संस्थेचा लेखाजोखा, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नुसार सादर करणे कायद्याने बंधनकारक आहे.

पतसंस्थांच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाने अंर्तमुख होवून लेखापरिक्षणाचे २०० मार्कस् व आकारावयाचे ऑडीट शुल्क ह्या बद्दलची अन्यायकारक भुमिका बदलली पाहिजे. अनेक ठिकाणी ऑडीट वर्ग देताना २०० मार्कस्मध्ये प्रचंड विसंगती व अव्यवहारीकपणा आहे. अत्यंत घाईने व सर्वार्थाने अभ्यास न करता व या विषया संदर्भात जाहीर मतप्रणाली न मागविता हा निर्णय घेतलेला आहे. त्याचप्रमाणे ऑडीट फी बाबत शासनाने कमालच केलेली आहे. शासन आदेश क्र. सीसी / ऑडीट / १५ मे १९९२ रोजी मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, यांनी नियम ७४ अंतर्गत प्रसिध्द केलेल्या नागरी सहकारी बँका व पतसंस्था यांचे ऑडीटचे दर खालीलप्रमाणे आहेत....

| | | | |
|---|---|---|---|
| नागरी सहकारी बँका | १. | रु. १० कोटीपर्यंत... | ५ नये पैसे शेकडा |
| | २. | नंतरच्या रू. ९० कोटींवर... | २ नये पैसे शेकडा |
| | ३. | नंतर व रु. १०० कोटींवर... | १ नया पैसा शेकडा |
| बिगरशेती व नागरी सहकारी पतसंस्था व पगारदार कर्मचाऱ्यांच्या सहकारी पतसंस्था | १. | रु. ५ लाखापर्यंत... | २५ नये पैसे शेकडा |
| | २. | नंतरच्या रु. ५ लाखावर... | १५ नये पैसे शेकडा |
| | ३. | नंतरच्या रु.१० लाखांवर... | १० नये पैसे शेकडा |
| | ४. | रु. १ कोटींवर... | ५ नये पैसे शेकडा |

वरील **ऑडीट फी चा नागरी सहकारी बँका व पतसंस्था तक्ता बघितल्यानंतर आपल्या लक्षात येईल की शासन पतसंस्थांवर कसा अन्याय करीत आहे.** व निर्णयात सुध्दा कसा अव्यवहारीकपणा आहे. पतसंस्थांना ताकद देण्याच्या ऐवजी त्यांना दुर्बल करण्याची मानसिकता आपल्या राज्याला शोभत नाही. जे सहज करणे शक्य आहे ते सुद्धा शासन करीत नाही. तरी सुध्दा शासनाने पतसंस्थांच्या ऑडीट फी मध्ये आपल्या कायद्याने दिलेल्या अधिकारात सवलत व माफी देवून **पतसंस्थांसाठी ऑडीट फी सरसकट केवळ १ नया पैसा शेकडा दराने परिपत्रक काढून लागू केले पाहिजे.** आणि ही आमची मागणी शासनाने त्वरीत मान्य करुन पतसंस्थांना दिलासा देण्यास सुरुवात केली पाहिजे. ज्या सहकारी संस्थेला राज्य शासन किंवा शासकीय उपक्रम यांचेकडून

हमीसह वित्त सहाय्य देण्यात आले असेल, अशा प्रत्येक संस्थेच्या बाबतीत आणि शिखर सहकारी संस्था, राज्य व जिल्हा स्तरावरील संघीय संस्था, जिल्हा मध्यवर्ती बँका, सहकारी साखरकारखाने व सुत गिरण्या, नागरी सहकारी बँका, जिल्हा व तालुका खरेदी विक्री संघ, तसेच राज्य शासन राजपत्रातील अधिसुचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही सहकारी संस्थेचे प्रत्येक सहकारी वर्षात निदान एकदा, हिशोबाचे लेखापरिक्षण करण्याची कलम ८१ नुसार निबंधकाची कायदेशीर जबाबदारी आहे. वर उल्लेखिलेल्या संस्थांपेक्षा अन्य प्रकारच्या सर्व सहकारी संस्था ज्यामध्ये पतसंस्थांचा समावेश आहे अशा प्रत्येक संस्थेचा, प्रत्येक सहकारी वर्षात निदान एकदा निबंधकाने ठेवलेल्या लेखापरिक्षक नामिकेतील लेखापरिक्षकाकरवी किंवा इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाउंटस् ऑफ इंडिया या संस्थेने दिलेले सहकार लेखापरिक्षण प्रमाणपत्र धारण करणाऱ्या एखाद्या सनदी लेखापालाकरवी आपल्या हिशोबाची लेखापरिक्षण करण्याची तजवीज करण्याची जबाबदारी कलम ८१(१)(ब) नुसार सहकारी निबंधकाची आहे. आणि त्यामध्ये ज्या सहकारी पतसंस्थेचे रुपये एक कोटीपेक्षा जास्त खेळते भांडवल आहे, त्या पतसंस्थांचे लेखापरिक्षण निबंधकाने ठेवलेल्या वरिलप्रमाणे लेखापरिक्षक नामिकेतील लेखापरिक्षकाकरवी करण्याचे निर्देश दिनांक २३ मे २००३ रोजीच्या आदेशाप्रमाणे महाराष्ट्रासाठी लागू आहे. व एक कोटी पेक्षा कमी रकमेचे खेळते भांडवल असणाऱ्या पतसंस्थांचे लेखापरिक्षण शासकीय सेवेत असणाऱ्या लेखापरिक्षकांडून करण्याची तजवीज उपरोक्त आदेशात आहे.

वरील उल्लेखावरुन आपल्या लक्षात येईल की, कुठल्याही सहकारी पतसंस्थेवर कोणाची लेखापरिक्षक म्हणून नेमणूक करावयाची, याचे संपूर्ण अधिकार निबंधकास आहे, आणि रुपये एक कोटीच्या वरील खेळते भांडवल असणाऱ्या पतसंस्थांचे लेखापरिक्षण करणेसाठी व एखादी संस्था आपल्या मार्फत लेखापरिक्षण करुन घेण्यासाठी संबंधित लेखापरिक्षकांना निबंधकाशी प्रथमपासून वेळोवेळी प्रत्यक्ष व लेखी स्वरुपात संपर्क करावा लागतो आणि आपल्या नावे एखाद्या किंवा एकाहून अधिक पतसंस्थांचे लेखापरिक्षण करणेसाठी लेखी आदेश निबंधकांकडून मिळवावा लागतो.

गेले २-३ वर्षांच्या अनुभवावरुन पतसंस्थांचे लेखापरिक्षण ही बाब **बाजारी स्वरुपात** प्रकट झालेली आहे. एका पतसंस्थेवर एका पेक्षा अधिक लेखापरिक्षकाची नियुक्ती करुन संबंधितांनी राज्यात हैदोस घातलेला आहे. जी पतसंस्था अशा प्रकाराला प्रतिआव्हान देते त्या पतसंस्थांना, संबंधितांमार्फत अधिकाराचा गैरवापर करुन पतसंस्थांच्या पाठिमागे ससेमीरा लावतात. ही बाब सरकार, सहकार सचीव व सहकार आयुक्त यांना पुर्णपणे ज्ञात असते. परंतू भारतीय लोकशाहीमध्ये **मागेल त्यालाच व गरज भासल्यास न्याय द्यायचा , इतरांना मात्र नाही,** ही बाब सर्वांना माहीत आहेच. अधिकाऱ्यांच्या म्हणजेच निबंधकांच्या म्हणजेच रजिस्ट्रारच्या म्हणजेच सहकार आयुक्तांच्या म्हणजेच राज्य सरकारच्या विरोधात याबद्दल ब्र काढण्याची व न्याय मागण्याची एक टक्का सुध्दा मानसिकता सहकारी कार्यकर्त्यांमध्ये शिल्लक राहिलेली नाही. हेच मुळात पतसंस्थांना व इतर सहकारी संस्थांना देखील स्वत: अडचणीत येण्याचे प्रमुख कारण आहे.

रुपये एक कोटीच्या वर खेळते भांडवल असणाऱ्या पतसंस्थांचे लेखापरिक्षक म्हणून त्या पतसंस्थांकडून मिळणाऱ्या अधिकृत **शुल्काच्या ४० टक्के रक्कम मोजल्या शिवाय त्या पतसंस्थेची ऑर्डर त्या लेखापरिक्षकाला**

**मिळतच नाही हे कटू सत्य आहे.** परंतू संबंधित लेखापरिक्षक त्या पतसंस्थेत लेखापरिक्षण करण्यासाठी गेल्यानंतर लेखापरिक्षण स्वत: १०० टक्के केंव्हाच करीत नाही. ११ वी व १२ वी झालेली मुले लेखापरिक्षकाने महत्वाचे काम लाल पेन्सीलने खुणा करुन करीत असल्याचे सार्वत्रिक चित्र आहे. वास्तविक असे काम करण्याचे अधिकार निबंधकाने नेमलेल्या लेखापरिक्षकाला दिलेले असतात. परंतु ही सर्व करामत ४० टक्यांची आहे. आणि या बाबत एक दिवस १०० टक्के उद्रेक होणार व अनेकांना अशाप्रकारे संभाव्य कटू कारवाईला सामोरे जावे लागणार किंबहूना **नोकरीतील निलंबन, व तुरुंगाची हवा** भविष्यात संबंधितांच्या वाट्याला येणार याची काळ वाट पहात आहे. आणि हे सर्व १ एप्रिल २००७ पासून त्वरीत थांबावे यासाठी संबंधितांना या अग्रलेखाद्वारे पुर्वसूचना आहे, हे या निमीत्ताने आम्ही जाहीर करीत आहोत.

परंतु पतसंस्थांकडून लेखापरिक्षक वरील फीच्या दराच्या ठरलेल्या परिपत्रकाच्या अतिरिक्त रक्कमा खुले आम मागत असतात. व पतसंस्था निमूटपणे देत असतात. हे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. कारण पतसंस्थांकडून असे अतिरीक्त शुल्क घेण्याचे कुठले अधिकार लेखापरिक्षकाला आहेत? शासनाचे / निबंधकाचे तरी लेखी आदेश आहेत काय? हे बघण्याची, तपासण्याची व खात्री करुन घेण्याची हिम्मत कोणातही राहिलेली नाही. ही बाब अत्यंत दुर्दैवी आहे. **सर्व्हिस चार्जेसच्या नावाखाली** लेखापरिक्षक खुले आम पतसंस्थांकडून अधिकृत फीच्या व्यतिरीक्त रोख किंवा धनादेशाद्वारे रक्कम मागतात. ही बाब १०० टक्के बेकायदेशीर व पतसंस्थांवर भर दिवसा दरोडा टाकण्याचा भयंकर प्रकार आहे. केवळ संबंधित लेखापरिक्षक पतसंस्थेच्या व्हाऊचरवर सही करुन देतो व क्रॉस चेकद्वारे रक्कम स्विकारतो ही बाब पुरेशी नाही, एवढेच नाही तर तशी अतिरिक्त रक्कम देण्याचा व घेण्याचा अधिकार कोणालाही नाही याची नोंद पतसंस्थांनी गंभीरपणे घ्यावी असे आवाहन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ७४ नुसार निबंधकास किंवा त्याने नेमलेल्या लेखापरिक्षकास पतसंस्थांकडून हिशोब तपासणी विषयक आणि परिक्षणा विषयक आकार बसविण्याचे अधिकार महाराष्ट्र शासनाची मान्यता घेवून दिलेले आहेत व विधीमान्य ऑडीट फीचे दर वरील तक्त्याप्रमाणे आहेत. त्यामुळे इतर कुठल्याही प्रकारची लेखापरिक्षकाने मागितलेली रक्कम रोख किंवा सर्व्हिस चार्जेसच्या नावाखाली अन्य कुठल्याही कारणास्तव व्हाऊचरवर सही लेखापरिक्षकांनी केली तरी, व क्रॉस धनादेशाद्वारे रक्कम स्विकारण्याची तयारी दाखविली तरी, कुठल्याही पतसंस्थेने अशा ऑडीटरांना वरील तक्त्यात असलेल्या विधीमान्य ऑडीट फीच्या व्यतिरिक्त एक रुपया देखील देवू नये. हे आम्ही या निमीत्ताने पुन्हा एकदा आपणास आवर्जुन कथीत करीत आहोत, याची पतसंस्थांनी कृपया नोंद घ्यावी.

जर लेखापरिक्षकाने अतिरिक्त रक्कम रोख वा धनादेशाद्वारे देत नाही, म्हणून २००गुणांप्रमाणे वरचा ऑडीट वर्ग देण्यास नकार दर्शविला तरी, ह्या ऑडीट वर्गाच्या मोहाला पतसंस्थांनी बळीपडूनये. तसेच कुठलाही ऑडीट वर्ग केवळ अतिरीक्त रकमा न दिल्यामुळे अधिकाराचा गैरवापर करुन ऑडीटरने दिला नाही व तो आपणांस सरळसरळ अन्याय वाटला तर, त्या पतसंस्थेने त्वरीत आपल्या संबंधित निबंधकास आणि राज्याच्या सहकार आयुक्तांना त्वरीत पुर्णनिरिक्षणासाठी स्वत:हून अर्ज करावा. तसेच झालेल्या प्रकाराचे सुध्दा लेखी तक्रार करावी. व त्याची एक प्रत **पतसंस्था परिवार** च्या पत्त्यावर पाठवावी. जेणेकरुन आपणांस न्याय मिळणेसाठी मदत होईल.

आपल्या पतसंस्थेस सन २००७ –०८ या सहकारी आर्थिक वर्षासाठी शुभेच्छा !

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**